५२६०|६५

जा.क्र.उमाशि-२/शि.मा./पुवि/११-१२/
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : २३/२/२०१२
2 MAR 2012

प्रति

**प्राचार्य/प्राचार्या,**
**उच्च माध्यमिक विद्यालय/कनिष्ठ महाविद्यालय,**
**पुणे / सोलापूर / अहमदनगर.**

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ अथवा त्या पूर्वी कनिष्ठ महाविद्यालयात नियुक्त केलेले शिक्षक/ शिक्षण सेवक शिक्षकेतर कर्मचारी नियुक्तीस मान्यता मिळणेबाबत.**

**संदर्भ :- १) या कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र दिनांक २५/११/२०११**
**२) मा. शिक्षण संचालक (माध्य व उच्च माध्य) शिक्षण संचालनालय, पुणे यांचेकडील पत्र क्रं. एचएससी-१५२०११/शिमाशि/१२-एचएस/दि. २५/२/२०११**

शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये या कार्यालयाने शिक्षक मान्यता शिबीर माहे डिसेंबर २०११ मध्ये दिनांक १/१२/२०११ ते २१/१२/२०११ या कालावधीत पुणे मुख्यालयी वेगवेगळया कनिष्ठ महाविद्यालयात अयोजित करण्यात आली होती.

शिबीरात प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावांवर निर्णय कळविण्यात आलेले आहेत.

संस्था प्रमुख व प्राचार्य यांचे प्रस्ताव सदर शिबिरात सादर करण्याबाबतचे मुद्दे खालीलप्रमाणे

१. पुर्णवेळ, अर्धवेळ, प्रतिघडयाळी तास तत्वावरील, रजा कालावधी, प्राचार्य ग्रेड वेतन, माध्यमिक शिक्षकास उच्च माध्यमिकच्या कार्यभारावर अध्यापनासाठी नियुक्त केलेल्या शिक्षकांचा मान्यतेचा प्रस्ताव शिबिरात सादर करताना या कार्यालयाकडून वेळावेळी दिलेल्या सूचनोनुसार आपणस नेमून दिलेल्या तारखेस दुपारी १२.०० पूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

२. या पूर्वीच्या शिक्षक मान्यता शिबीरात प्राप्त झालेल्या प्रस्तावातील आक्षेप संबंधित कनिष्ठ महाविद्यालये/ उच्च माध्यमिक विदयालयांना कळविलेले आहेत. सदर आक्षेपांची पूर्तता होत असेल तरच या शिबिरात प्रस्ताव सादर करावा. अपूर्ण प्रस्ताव सादर होणार नाही याची दक्षता संस्था प्रमुख/प्राचार्यांनी घ्यावी.

३. शिबीराच्या वेळापत्रकाप्रमाणेच परिपूर्ण प्रस्ताव शिबिरात दाखल करुन निर्णय प्राप्त करुन घ्यावेत. शेवटच्या दिवशी अनावश्यक गर्दी करणे टाळण्यात यावी.

४. प्रस्ताव जाणकार लिपीकाबरोबरच शिबिरात सादर करावा. प्राचार्यांनी शिबीरात उपस्थित राहणे आवश्यक आहे.

५. शिबीरात नियुक्त शिक्षकासोबत मान्यतेचा प्रस्ताव दाखल केल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल याची नोंद घ्यावी.

६. या शै. वर्षातील हे शेवटचे शिक्षक मान्यता शिबीर असल्याने शिबीराचा कालावधी संपल्यानंतर दिनांक २२/३/२०१२ नंतर प्रस्ताव कार्यालयात दाखल करुन नयेत. त्याची दखल घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी

७. शिक्षण उपसंचालक यांना अचानक उद्‌भवलेल्या अन्य महत्वाच्या कामामुळे शिबीरात उपस्थित राहाता आले नाही तर सदर दिवशी दाखल झालेल्या प्रस्तावावर निर्णय कोणत्या तारखेस मिळेल याची माहिती शिबिरात दिली जाईल.

वरील बार्बीचे काटेकोर पणे पालन करुन परिपूर्ण प्रस्ताव शिबिरात दाखल करणे व मान्यता प्राप्त करुन घेणे याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहील.

**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग, पुणे**

**प्रत-**

१. मा. शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक )
शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, पुणे/सोलापूर/अहमदनगर
/- यांनी शिबीराचे वेळापत्रक व ठळक मुद्दे या बार्बीना आपल्या जिल्हयांच्या स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

३. प्राचार्य , पुना कॉलेज मोदीखाना पुणे-१
/- यांनी शिक्षक मान्यता शिबीराच्या वेळी आवश्यक त्या भौतिक सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात.

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे यांनी उच्च माध्यमिक विदयालये व कनिष्ठ महाविद्यालये यामध्ये नियुक्त करण्यात आलेले कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक, शिक्षण सेवक यांना मान्यता देण्याबाबतचे शिक्षक मान्यता शिबीराचे वेळापत्रक.

| अ.नं. | दिनांक | तालुके | स्थळ |
|---|---|---|---|
| १. | ७/३/२०१२ | अकोले, राहुरी, संगमनेर, कोपरगांव, राहाता, श्रीरामपूर, नेवासा | पूना कॉलेज, न्यू मोदीखाना, पुणे |
| २. | ९/३/२०१२ | श्रीगोंदा, पारनेर, पाथर्डी, कर्जत, शेवगांव जामखेड अहमदनगर शहर/तालुका | पूना कॉलेज, न्यू मोदीखाना, पुणे |
| ३. | १३/३/२०१२ | पंढरपूर, माळशिरस, मंगळवेढा सांगोला, माढा, करमाळा | पूना कॉलेज, न्यू मोदीखाना, पुणे |
| ४. | १४/३/२०१२ | अक्कलकोट, मोहोळ, बार्शी, सोलापूर शहर दक्षिण/उत्तर | पूना कॉलेज, न्यू मोदीखाना, पुणे |
| ५. | १५/३/२०१२ | पुणे शहर, पिंपरी चिंचवड हवेली | पूना कॉलेज, न्यू मोदीखाना, पुणे |
| ६. | १६/३/२०१२ | जुन्नर, आंबेगांव खेड, भोर, वेल्हा, मावळ | पूना कॉलेज, न्यू मोदीखाना, पुणे |
| ७. | १७/३/२०१२ | पुरंदर, इंदापूर, बारामती, दौंड, शिरुर | पूना कॉलेज, न्यू मोदीखाना, पुणे |
| ८. | २०/३/२०१२ | उर्वरीत क.म.वि. | पूना कॉलेज, न्यू मोदीखाना, पुणे |

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १

D F Ref Letter